| Article Date | Headline / Summary | Publication | Edition | Page No. | Journalist |
|---|---|---|---|---|---|
| **Regional** | | | | | |
| 04 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Prahar | Mumbai | 2 | Bureau |
| 03 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Pudhari | Mumbai | 4 | Bureau |
| 03 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Lokmat | Mumbai | 1, 4 | Bureau |
| 03 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Punya Nagari | Mumbai | 4 | Bureau |
| 03 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Saamna | Mumbai | 5 | Bureau |
| 03 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Tarun Bharat | Mumbai | 6 | Bureau |
| 23 Jun 2015 | Tata Power's Club Enerji organises summer power workshop in Mumbai | Navakal | Mumbai | 5 | Bureau |

# Regional

| | | | |
|---|---|---|---|
| Publication: | **Prahar** | Edition: | **Mumbai** |
| Published Date: | **04 Jun 2015** | Page No.: | **2** |
| | | Display: | **1/1** |



## टाटा पॉवरतर्फे ऊर्जा बचतीसाठी उन्हाळी शिबिर

**मुंबई :** राष्ट्रीय स्तरावरील ऊर्जा, स्त्रोत, तसेच नागरी व नैतिक मूल्य संवर्धन उपक्रम असलेला क्लब टाटा पॉवर एनर्जीतर्फे मुंबईतील विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. क्लब एनर्जीबाबत संक्षिप्त माहिती देऊन या शिबिराची सुरुवात झाली, त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसमवेत ट्रॉम्बे कॉलनी येथील बायोगॅस प्रकल्पाला भेट दिली. या वेळी घरी गांडूळ खत बनवण्याची प्रक्रिया दाखवण्यात आली आणि वृक्षरोपण मोहीमही राबवण्यात आली. मुंबई शहरातील विविध शाळांतील ५५पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

Back to Index

| Publication: | **Pudhari** | Edition: | **Mumbai** |
| --- | --- | --- | --- |
| Published Date: | **03 Jun 2015** | Page No.: | **4** |
| | | Display: | **1/1** |



## टाटा पॉवर क्लब एनर्जीतर्फे उन्हाळी शिबीर

**मुंबई :** टाटा पॉवर क्लब एनर्जीतर्फे मुंबईत मंगळवारी २ जून रोजी उर्जा संर्वधनावर उन्हाळी शिबीर आयोजित करण्यात आले होते. उर्जा, स्त्रोत, तसेच नागरी व नैतिक मुल्यांच्या सवंर्धनाबाबबत संवेदनशील बनविणाऱ्या या शिबीरात मुंबईतून ५५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच दिवसभरातील विविध कार्यक्रमाचा लाभही त्यांनी घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणपुरक विश्वाचे मुल्य तसेच उर्जा व नैसर्गिक स्त्रोतांच्या सवंर्धनाचे महत्व समजण्यास मदत झाली. देशाच्या भावी पिढीला ज्ञानी करण्याचे महत्वही या उपक्रमातून प्रदर्शित झाले.

Back to Index

| | | | |
|---|---|---|---|
| Publication: | **Lokmat** | Edition: | **Mumbai** |
| Published Date: | **03 Jun 2015** | Page No.: | **1, 4** |
| | | Display: | **1/2** |



**ऊर्जा संवर्धनासाठी विद्यार्थी सरसावले!**

आजही भविष्यात विजेचा प्रश्न गंभीर होणार असल्याने शाळाशाळांतून ऊर्जाबचतीचे धडे देण्यात येत आहेत.

पान ४

Back to Index

| Publication: | Lokmat | Edition: | Mumbai |
| --- | --- | --- | --- |
| Published Date: | 03 Jun 2015 | Page No.: | 1, 4 |
| | | Display: | 2/2 |

# ऊर्जा संवर्धनास विद्यार्थी सरसावले!

## ऊर्जाबचतीचे धडे : टाटा पॉवरचे उन्हाळी शिबिर

**मुंबई :** ऊर्जेसह नैसर्गिक स्रोतांचे महत्त्व जाणून घेण्यासाठी ५५ विद्यार्थी मित्रांनी हिरीरीने पुढाकार घेतला होता. निमित्त होते ते ऊर्जा संवर्धन उन्हाळी शिबिराचे.



आतासारखा भविष्यातही विजेचा प्रश्न गंभीर होणार असल्याने शाळाशाळांतून ऊर्जाबचतीचे धडे देण्यात येत आहेत. मात्र यावरही विद्यार्थी मित्रांना प्रत्यक्षात ऊर्जेचे महत्त्व समजावे म्हणून टाटा पॉवरने ऊर्जा संवर्धन उन्हाळी शिबिर हाती घेतले होते. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांचेही धडे देण्यात आले.

या वेळी विद्यार्थ्यांना पालकांसमवेत ट्रॉम्बेमधील बॉयोगॅस प्रकल्पाला भेट देण्याची संधी मिळाली. गृहनिर्माण सोसायट्यांकरिता हा प्रकल्प कसा फायदेशीर आहे, याचे महत्त्व त्यांना या वेळी पटवून देण्यात आले. सेंद्रीय खत प्रकल्पाबाबतही विद्यार्थ्यांना जागृत करण्यात आले. आणि गांडूळ खत बनविण्याच्या प्रक्रियेसह वृक्षारोपणालाही विद्यार्थ्यांनी हातभार लावला. (प्रतिनिधी)

Back to Index

| Publication: | **Punya Nagari** | Edition: | **Mumbai** |
| --- | --- | --- | --- |
| Published Date: | **03 Jun 2015** | Page No.: | **4** |
| | | Display: | **1/1** |

# ऊर्जा संवर्धनावर उन्हाळी शिबीर

## टाटा पॉवर क्लब एनर्जीचा उपक्रम

**मुंबई :** टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीतर्फे मुंबईतील विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ऊर्जा संवर्धनाच्या संदेशाचा प्रसार देशभरात करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. ऊर्जा व स्रोत संवर्धनाबाबत जनजागृती करणे आणि संवेदनशील बनवण्याच्या उद्देशाने आयोजित या उन्हाळी शिबिरात विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांबाबतही महत्त्वाचे धडे देण्यात आले. शिबिराच्या समारोपादरम्यान सहभागी झालेल्या सर्वांना प्रमाणपत्र देण्यात आले.

ऊर्जा, स्रोत तसेच नागरी व नैतिक मूल्य संवर्धनासंदर्भात हा उपक्रम माहितीपूर्ण होण्याकरिता विविध विषयांवरील व्याख्यानांची आखणी केली होती. क्लब एनर्जीबाबत संक्षिप्त माहिती देऊन या शिबिराची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसोबत ट्रॉम्बे कॉलनी येथील बायोगॅस प्रकल्पाला भेट दिली. हौसिंग सोसायट्यांना या प्रकल्पाचा होणारा लाभ तसेच प्रकल्प राबवण्यास कसा सोयीस्कर आहे ते फिरून पाहता येईल, अशी त्याची विशिष्ट रचना केलेली आहे. यानंतर सेंद्रिय मिश्रण खताचा खड्डा व जिरता खड्डा बनवण्याची प्रक्रिया दाखवण्यात आली. तसेच घरच्या घरी गांडुळखत बनवण्याची प्रक्रिया दाखवण्यात आली आणि वृक्षारोपण मोहीमही राबवण्यात आली.

मुंबई शहरातील विविध शाळांतील ५५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी क्लब एनर्जीच्या उन्हाळी शिबिरात सहभाग नोंदवला. याबाबत टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले की, ऊर्जा संवर्धन व बचत करण्यास टाटा पॉवर बांधिल आहे. हा संदेश घरोघरी पोहचवण्यासाठी तसेच पर्यावरणपूरक व उज्ज्वल भवितव्याच्या जागृतीसाठी टाटा पॉवर क्लब एनर्जी महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून चांगले विश्व घडवण्यसाठी भावी पिढीला प्रशिक्षित करण्याची आमची बांधिलकी अधिक बळकट करीत आहोत. तसेच आमच्या समाजासोबत नाते जोडत असल्याचे सांगण्यात आले आहे.

Back to Index

| | | | |
|---|---|---|---|
| Publication: | **Saamna** | Edition: | **Mumbai** |
| Published Date: | **03 Jun 2015** | Page No.: | **5** |
| | | Display: | **1/1** |

महत्त्वाचे

## टाटा पॉवरचे चिमुरड्यांना ऊर्जा संवर्धनाचे धडे!

**विजेच्या** बचतीबरोबरच ऊर्जा संवर्धनाचे शाळकरी विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून देण्यासाठी टाटा पॉवरच्या क्लब एनर्जीने मुंबईत उन्हाळी शिबीर घेतले. यावेळी ऊर्जा संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ५५ विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसमवेत ट्रॉम्बे कॉलनी येथील बायोगॅस प्रकल्पाला भेट दिली. हौसिंग सोसायट्यांना या प्रकल्पाच्या होणारा लाभाची माहिती दिली. ऊर्जा संवर्धन व बचत करण्यास टाटा पॉवर बांधील असून संवर्धनाचा हा संदेश घरोघरी पोहचवण्यासाठी टाटा पॉवर एनर्जी हे एक व्यासपीठ असल्याचे टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक अनिल सारडाना यांनी सांगितले.

Back to Index

| Publication: | Tarun Bharat | Edition: | Mumbai |
|---|---|---|---|
| Published Date: | 03 Jun 2015 | Page No.: | 6 |
| | | Display: | 1/1 |

# सुट्टीचा सदुपयोग करुन चिमुरड्यांनी गिरविले वीज बचतीचे धडे

## टाटा पॉवर क्लब एनर्जीतर्फे ऊर्जा संवर्धनावर उन्हाळी शिबीर

प्रतिनिधी
मुंबई

टाटा पॉवरचा राष्ट्रीय स्तरावरील ऊर्जा, स्त्रोत संवर्धन उपक्रम असलेल्या क्लब एनर्जीतर्फे मुंबईतील विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. ऊर्जा संवर्धनाचा प्रसार देशभरात करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. ऊर्जा संवर्धनाबाबत जनजागृती करणे आणि संवेदनशील बनविण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या उन्हाळी शिबिरात विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांबाबतही महत्त्वाचे धडे देण्यात आले. शिबिराच्या समारोपादरम्यान सहभागी झालेल्या सर्वांना प्रमाणपत्रही देण्यात आले. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये चिमुरड्यांना वीज बचतीचे धडे मिळाले.

ऊर्जा संवर्धनासंदर्भात विविध व्याख्यानांचेही आयोजन करण्यात आले होते. क्लब एनर्जीबाबत संक्षिप्त माहिती देऊन या शिबीराची सुरुवात झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांसमवेत ट्रॉम्बे कॉलनी येथील बायोगॅस प्रकल्पाला भेट दिली. हौऊसिंग सोसायट्यांना या प्रकल्पाचा होणारा लाभ तसेच प्रकल्प राबविण्यास कसा सोईस्कर आहे हेही या विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. यानंतर सेंद्रीय मिश्रण खताचा खड्डा आणि जिरता खड्डा विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. तसेच असा प्रकल्प राबविण्याची प्रक्रियाही समजावून सांगण्यात आली. त्यानंतर घरच्या घरी गांडूळ खत बनविण्याची प्रक्रियाही दाखविण्यात आली.

**मुंबई शहरातील विविध शाळांमधील ५५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग**

या प्रकल्पाचा भाग म्हणून वृक्षारोपण मोहीमही राबविण्यात आली. मुंबई शहरातील तसेच विविध शाळांमधील ५५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी क्लब एनर्जीच्या या उन्हाळी शिबीरामध्ये सहभाग घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक विश्वाचे मूल्य तसेच ऊर्जा आणि नैसर्गिक स्त्रोतांच्या संवर्धनाचे महत्त्व समजावण्यास मदत झाली. ऊर्जा संवर्धनाबाबत देशाच्या भावी पिढीला सजग करण्याचे महत्त्वही या उपक्रमातून पटवून देण्यात आले.





ऊर्जा संवर्धन आणि बचत करण्यासाठी आपण सगळेच बांधील आहोत. हा संदेश घरोघरी पोहोचविण्यासाठी तसेच पर्यावरणपूरक आणि उज्ज्वल भवितव्याच्या जनजागृतीसाठी टाटा पॉवर क्लब एनर्जी हे एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही भावी पिढीला प्रशिक्षित करण्याची आमची बांधिलकी अधिक बळकट करत आहोत तसेच आमच्या समाजासोबत अखंड नातेसंबंध जोडत आहोत, असे टाटा पॉवर व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना यांनी सांगितले.

Back to Index

| Publication: | Navakal | Edition: | Mumbai |
| --- | --- | --- | --- |
| Published Date: | 23 Jun 2015 | Page No.: | 5 |
| | | Display: | 1/1 |



# ऊर्जा संवर्धनास विद्यार्थी सरसावले!

मुंबई, सोमवार - ऊर्जेसह नैसर्गिक स्रोतांचे महत्त्व जाणून घेण्यासाठी ५५ विद्यार्थी मित्रांनी हिरीरीने पुढाकार घेतला होता. निमित्त होते ते ऊर्जा संवर्धन उन्हाळी शिबिराचे.

आतासारखा भविष्यातही विजेचा प्रश्न गंभीर होणार असल्याने शाळाशाळांतून ऊर्जाबचतीचे धडे देण्यात येत आहेत. मात्र यावरही विद्यार्थी मित्रांना प्रत्यक्षात ऊर्जेचे महत्त्व समजावे म्हणून टाटा पॉवरने ऊर्जा संवर्धन उन्हाळी शिबिर हाती घेतले होते. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांचेही धडे देण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना पालकांसमवेत ट्रॉम्बेमधील बॉयोगॅस प्रकल्पाला भेट देण्याची संधी मिळाली. गृहनिर्माण सोसायट्यांकरिता हा प्रकल्प कसा फायदेशीर आहे, याचे महत्त्व त्यांना या वेळी पटवून देण्यात आले. सेंद्रीय खत प्रकल्पाबाबतही विद्यार्थ्यांना जागृत करण्यात आले. आणि गांडूळ खत बनविण्याच्या प्रक्रियेसह वृक्षारोपणालाही विद्यार्थ्यांनी हातभार लावला.

Back to Index